# भूमिका

मराठी भाषेचा उन्नतीचा कालखंड एकोणिसाव्या शतकास मानावे लागते. कारण हस्तलिखिता कडून मुद्रणापर्यंत पोहचण्याच्या या कालखंडाचे श्रेय पाश्चात्यांना द्यावे लागते. आपल्या उदार व उदात्त धोरणाने त्यांनी शिक्षणास प्राधान्य दिले. यातूनच प्रेरणा घेऊन महात्मा फुले, महर्षी शिंदे, आगरकर, राजर्षी शाहु महाराज व पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजसुधारणेचे व शिक्षण देण्याचे कार्य केले.

इंग्रजांच्या प्रेरणेने, अनेक समाजसुधारकांच्या प्रेरणेने मराठी वाङःमयनिर्मिती होण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्र वीस ते पंचवीस हजार खेडी आहेत. भारतीय संस्कृती प्रामुख्याने ग्रामीण संस्कृती, शेतीप्रधान संस्कृती आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारचे लक्ष प्रामुख्याने खेडयांची सुधारणा करण्याकडे असते. स्वातंत्र्यपूर्ण काळात ग्रामीण भागाची सुधारणा पाहिजे त्या प्रमाणात झाली नाही. पण स्वातंत्र्योत्तर काळात सर्व स्तरावर ग्रामीण भागाचा विकास होत गेला.

आजच्या मराठी साहित्याला अनुभवाचा कसदारपणा बहाल करणारे जे विविध प्रवाह पुष्ट झाले. त्यामध्ये ग्रामीण साहित्याचा प्रवाह महत्वाचा मानला जातो. समाजजीवनातील स्थित्यंतराचे प्रामाणिकपणे कलात्मक रूप चित्रित करणारा हा प्रवाह आहे. देशीपणाचे वैभव मिरवणारा हा प्रवाह आहे. 'देशीपणा' ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

'ग्रामीण साहित्य' हा पाश्चात्य संस्कृतीच्या अभ्यासाने प्रेरीत झालेल्या 'आधुनिक मराठी ' साहित्याचा एक भाग आहे. ब्रिटीशपूर्व काळात ग्रामीण जीवनाविषयीचे उल्लेख लोकसाहित्य किंवा महानुभाव साहित्यात सापडतात. परंतु ग्रामीण वाङःमयाला खरा बहर १९४५ नंतर आला.

१९२० नंतर बदललेली राजकीय परिस्थिती, गांधीजीनी खेडयाचे भारतीय जीवनातील स्थान नव्या जाणीवासह पटवून दिले. या सर्वांचा परिणाम साहित्यावर झाला. या सर्व घटनांचा परिणाम साहित्यिकांची दृष्टी खेडयापाडयाकडे वळली.

१९४०-४५ नंतर ग्रामीण जीवनातील प्रत्यक्ष अनुभव सामाजिक कार्याच्या निमित्ताने माटे यांनी अनुभवले त्याचे चित्रण त्यांनी आपल्या कथेतून रेखाटले यामुळेच पुढे ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे यांनी ग्रामीण भागातील लोकांचे जीवन रेखाटण्याचा प्रयत्न केला.

पेंडसे, दांडेकर, गाडगीळ, भावे, गोखले, शिरूरकर यासारख्या अनेक लेखकांनी ग्रामीण वाङःमयाला समृध्द केले तर व्यंकटेश माडगूळकर यांनी माणदेशाकडील ग्रामीण भागातील लोकांचे वास्तव चित्रण केले. शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या विसंगतीवर विनोदपूर्ण लेखन केले आहे.

ग्रामीण भागात ग्रामीण लोकांच्यातील भयानकता, दारिद्रय, दु:ख, दैन्य, भूक, अज्ञान, शोषण यांचे चित्रण ग्रामीण वाङ:मयात येते. याच पार्श्वभूमीवर डॉ. आनंद यादव यांनी शिक्षणासाठी घेतलेले अतोनात कष्ट येईल त्या परिस्थितीला संयमाने दिलेले तोंड, यातूनच स्वत:मधील कलावंत ते घडवत गेले. दारिद्रयाशी झुंज देत देत त्यांचा शिक्षणाचा प्रवास प्राध्यापक झाल्यावर थांबतो. त्यांची जिद्द, शिक्षण घेण्याची उमेद या सर्वांचे आपल्याशी कुठेतरी नाते आहे. याची जाणीव झाल्यामुळेच मी त्यांच्या 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' या चरित्रात्मक कादंब-याचा एम. फिल. साठी अभ्यास करण्याचे ठरविले.

डॉ. आनंद यादव हे ग्रामीण चळवळीचे अग्रदूत आहेत. ग्रामीण जीवनातील उदयान्मुख कविंचे ते 'जागले' आहेत हे समजून घ्यावे, त्याचे प्रबोधन व्हावे. समाज परिवर्तनाच्या या लढयाचा हा आलेख अभ्यासाच्या निमित्ताने व्हावा. या सर्वांचा दस्तऐवज विद्यापीठात असावा, पदवीच्या निमित्ताने हे काम होईल असे वाटल्याने हे काम करायचे ठरविले.

## प्रकरण १ ले

## आनंद यादव यांचा व्यक्तिमत्वाचा व वाड:मयाचा परिचय :

डॉ. आनंद यादव यांनी गेल्या पस्तीस ते अडतीस वर्षात कविता, कथा, कादंबरी, ललितगद्य, समीक्षा तसेच अलिकडेच प्रसिध्द झालेला 'काचवेल' हा आत्मचरित्माक कादंबरीचा चौथा खंड व 'सकाळ' मध्ये ग्राम संस्कृती नावाने दर रविवारी प्रसिध्द होणारे लेख इत्यादि विविध वाड:मयप्रकारात लेखन केले. हे करीत असताना यादवांनी आपल्यातला लेखक जाणीवपूर्वक आणि काळजीपूर्वक जोपासला आहे. म्हणूनच वेगवेगळया वाड:मयप्रकारात ते अजूनही तेवढयाच समर्थपणे लेखन करीत आहेत. त्याचबरोबर त्यांनी साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेचा खोलवर शोध घेण्याचा प्रयत्न केला, स्वत:च्या आणि इतरांच्या साहित्यकृतीची जाणकारीने चर्चा केली. आधुनिक ग्रामीण साहित्याची भूमिका यादवानी ग्रामीण साहित्य संमेलने, मेळावे, परिसंवाद यातून वेळोवेळी विस्तृतपणे मांडली आहे. सर्जनशील लेखक, साक्षेपी समीक्षक आणि साहित्यचळवळीचे प्रवर्तक ही त्याची त्रिविध स्वरूपाची वाड:मयीन कामगिरी वैशिष्टयपूर्ण आहे.

'आनंद यादव-साहित्य आणि जीवन' या पुस्तकाच्या मलपृष्ठावर गो. म. कुलकर्णी म्हणतात ' मराठीच्या साहित्यामध्ये डॉ. आनंद यादव या नावाला दुहेरी महत्व आहे. ग्रामीण संवेदनाचा समर्थ अविष्कार घडविणारे साहित्यिक म्हणून आनंद यादव हे नाव महत्वाचे आहेच. पण त्याचबरोबर ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करण्याचा एक शिस्तशीर प्रयत्न करणारे धुरंधर नेते म्हणूनही यादवांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. मुख्य म्हणजे ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करीत असताना यादवानी कोठेही साहित्य-मूल्यांशी तडजोड करण्याची भाषा केली नाही किंवा ग्रामीण साहित्याच्या आकलन - आस्वादासाठी नव्या निकषाची मागणी केलेली नाही. डॉ. आनंद यादव हे प्रतिभावंत लेखक आहेत. आपल्या प्रतिभेच्या हजारो डोळयांनी त्यांनी पर्यावरण अनुभवले. त्या पर्यावरणाचे नाद, स्पर्श, रूप, रस, गंध आत्मसात केले आणि त्यांना शब्दांचे शरीर बहाल केले. या प्रक्रियेच्या वाटेत उभे असलेले सारे संकेत त्यांनी नाकारले. आतील भावाजाशी प्रतारणा केली नाही. आनंद यादवासारख्या कैवारी मराठी ग्रामीण सारस्वताला लाभला हे आपले सुदैव म्हटले पाहिजे.

### वाड:मयीन जडणघडण :

आनंद यादव यांचा जन्म कोल्हापूर जिल्हयात कागल तालुक्यात ३० नोव्हेंबर १९३५ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. पूर्वजांच्या जकात गोळा करण्याच्या

व्यवसायावरून पडलेले पडनांव जकाते आणि आडनांव यादव वडील रत्नाप्पा जकाते यांना स्वतःच्या मालकीची शेती नव्हती. एका जमीन मालकाच्या शेतावर कूळ म्हणून ते सहकुटुंब राबत असत. दारिद्र्य आणि अज्ञान यांचा परंपरागत वारसा पाठीशी घेऊन जगणा-या या कुटुंबात यादवांचा जन्मा झाला. आईचे नाव ताराबाई. एकूण बारा भावंडापैकी आनंद यादव हे मुलांत मोठे. त्यामुळे मोठया मुलाने शेतीच्या कामात हातभार लावला पाहिजे ही वडिलांची अपेक्षा तशी त्यांच्या दृष्टीने रास्तच होती. भोवतालचे वातावरण कुठल्याही अर्थाने शिक्षणास अनुकुल नव्हते. माळ रानात गुरे राखायला जाणे. शेतात नेहमीच कामाला जाणे. घरात सर्व अशिक्षीत असल्यामुळे शिक्षणाबाबत कोणी मार्गदर्शक नाही किंवा शिक्षणासाठी सहाय्य करणारेही कोणी नव्हते. अशा प्रतिकुल वातावरणातही अगदी लहानपणापासूनच यादवांना शिक्षणाविषयी जबरदस्त ओढ निर्माण झाली होती. आपल्या घरातले दारिद्र्य, अज्ञान दूर करायचे असेल तर येईल त्या संकटाला तोंड देत शिकले पाहिजे ही त्यांची जिद्द होती. त्यासाठी अपार कष्ट घेण्याची, सर्व प्रकारचे हालअपेष्टा सोसण्याची त्यांची तयारी होती. ते शाळेत जाऊ लागले त्यावेळी त्यांचे पहिले शिक्षक साकेकर तर यादवांची शिक्षणाची ओढ, हुषारी आणि जिद्द पाहून सौंदलगेकर गुरूजींनी त्यांना शिक्षणासाठी मार्गदर्शक केले, प्रेरणा निर्माण केली. लहानपणापासूनच शिक्षणासाठी यादवांनी ज्या हालअपेष्टा, दुःख सोसले त्याला सीमा नाही.

खंडाने जमीन कसत असल्यामुळे आलेल्या उत्पन्नाचा बराच हिस्सा जमीन मालकाला द्यावा लागत होता. त्यामुळे शेतात रात्रं-दिवस राबणूक तेवढी उरत होती. यातून कुटुंबाची सुटका करावयाची असेल तर आपण शिकले पाहिजे असे यादवांना वाटत असे. मुलांना शिकविले पाहिजे हा विचार वडील रत्नाप्पांना कधीच शिवला नाही. याचे कारण म्हणजे त्याच्या घराण्यात शिक्षण कोणी घेतले नव्हते. त्यामुळे हीच परंपरा त्यांच्या मनात होती. प्रथम हिशोबापुरते मुलाला शिकवावे. म्हणून वडिलांनी, आईनी पाडव्याला शाळेत घातल. नवी कापड, डोक्याला काळी टोपी घातली. शाळेत जाताना वाटेत वडील म्हणाले, "लई शिकायचं बर काय ?" "दिवाणजी व्हायला पाहिजेस बघ", असे म्हणणारे वडील पुढे शिक्षणासाठी यादवांची चाललेली धडपड त्यांच्या मनाला पटत नव्हती. दुसरे म्हणजे दररोज उपस्थित होणारा पोटाचा प्रश्न त्यांना भेडसावत होता. शिक्षणाच्या नादाला लागलेल्या मुलाच्या पोटाला अन्न कुठले द्यायचे हा खरा प्रश्न होता. वडिलांचे मते सर्वजण राबले तर पोटाला अन्न मिळणार होते म्हणून ते यादवांना कधी भरपूर चोप देऊन तर कधी गोडी गुलाबीने सांगून पाहून त्यांनी आपल्या या मुलाला शिक्षणाच्या वेडया नादापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. यादवांची शिक्षणाची उर्मी, जिद्द वाढतच गेली. आईकडून मात्र प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळत असे त्यामुळे यादवांना शिकण्याची प्रेरणा मिळत असे.

अर्थात त्यात जाणीवपूर्वकता नव्हती. मुलाला शिक्षणाची एवढी हौस आहे. तर शिकू दे एवढाच भोळाभाबडा भाव त्यात होता. परंतु त्यामुळे वडिलांचा राग अधिकच वाढत असे. तटस्थ राहून अप्रत्यक्षपणे सहकार्य करून शिक्षणाच्या कामी मुलाला मदत करणा-या पत्नीवरही रत्नाप्पांनी राग काढला. एवढेच नव्हे तर प्रसंगी मारहाणही केली. शेवटी सर्व उपाय करून थकल्यावर मुलगा हातचा गेला. असा विचार मनात आणून त्यांनी त्याचा नादच सोडला. तथापी त्यांनी मुलाचे शिक्षण थांबविण्यासाठी त्यांनी दुसरी युक्ती केली. त्यांनी मुलाला जास्तीत जास्त वेळ शेतीच्या कामात गुंतवून ठेवले. जेणेकरून त्याला त्यातून शाळेसाठी व अभ्यासासाठी वेळ मिळू नये. पण यादवांनी यावरही मात केली. प्रसंगी ऊसाला पाणी पाजता पाजता त्यांचा शाळेचा अभ्यास चालू असे. वडिलांनी सोपविलेले शेतातील सर्व कामे लवकरात लवकर आटपून असेल त्या कपडयावर कधी वेळेत तर कधी उशिरा शाळेत पोहचत. उशिरा शाळेत गेल्यावर मात्र गुरूजींचा मार बसत असे पण त्याला सुध्दा न घाबरता जिद्दीने ते शिकत राहिले. वडिलांची मर्जी व शेतीची कामे सांभाळून कुणाच्याही मदतीशिवाय स्वत: अभ्यास करण्याचा छंद लावून घेतला. मिळेल ते पुस्तक वाचण्याचा सपाटा चालू ठेवला यासाठी मित्राच्या घरी जाऊन रात्री त्याच्या घरची पुस्तके ते वाचू लागले. यातूनच साहित्याची आवड निर्माण झाली. शेतीतील अनेक प्रकारची कष्टाची कामे करून त्यांचे बालमन पुस्तकाच्या जगात विहरत होते. या वयातच इतर कलांचा नादही यादवांना बालवयातच लागला. त्यांनी शाळेत असताना गॅदरिंगच्या वेळीही अनेक नकला ते करत असत. पुढे तर ते हायस्कूलमध्ये त्यांनी असे कार्यक्रम करून शिक्षणासाठी पैसे जमवले. अनेक आर्थिक संकटाना तोंड देत आपला आवडता वाचनाचा छंद जोपासत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. यातून जे अनुभव आले. हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या याचे चित्रण पुढे त्यांच्या वाड:मय निर्मितीतून दिसून येते.

## आनंद यादव यांची वाड:मयनिर्मिती

### कविता संग्रह :

हायस्कूलचे शिक्षण पूर्ण झाल्यावर १९५५ साली कागल सोडले. रत्नागिरीला सर्वोदय छात्रालयात राहून कॉलेजचे पहिले वर्ष पूर्ण केले. तेथे प्रा. रा. वा. चिटणीस, प्राचार्य य. द. भावे, यांचे मार्गदर्शन लाभले त्याच काळात श्री. पु. ल. देशपांडे, सौ. सुनिताताई देशपांडे हयांनी त्यांच्या कवितेचे कौतुक केले. त्यामुळे त्यांचा काव्यनिर्मितीचा आत्मविश्वास वाढीस लागला. आकाशवाणीवरती अखंड यादवांच्या अनेक श्रृतिका सादर होते. यातून बरेच मानधन मिळे. व. ह. पिटक्यांची ओळख झाल्यावर त्यांनी यादवांना

"तुमच्या कविता सहकारी पारितोषिकासाठी पाठवून द्या. निश्चित तुम्हाला त्याचा फायदा होईल" मी उद्योगाला लागलो. आजवर त्याची फकत एकच कविता 'ढवळे' नावाच्या मासिकात पहिल्या आणि शेवटच्या अंकात प्रसिध्द झाली होती. तीही भाईनी पाठविली होती. "एल. बी. रायमानेचं हस्ताक्षर चांगल होत. त्याच्या हस्ताक्षरात 'हिरव जग' ची एक प्रत तयार केली. नि एक प्रत खुद्द मी तयार केली. त्यात चाळीस कविता निवडल्या होत्या. बोर्डिगमधील 'सुतार' नावाच्या एक चित्रकार विद्यार्थी होता. त्यांच्याकडून 'हिरव जग' च्या दोन्ही वहयांवर कवितेशी सुसंगत अशी चित्रमय 'मुखपृष्ठ' तयार करून घेतली आणि रजिस्टर पोस्टान वहया बारा सप्टेंबरला पोस्ट केल्या. या कवितासंग्रहाला न्याय मिळाला त्याला राज्य सरकारच पारितोषिक मिळाले होते. त्यानंतर कोल्हापूरच्या चंद्रकांत शेरचे प्रकाशन मंदिरतर्फे तो अस्सल ग्रामीण भाषेतील काव्याचा 'जिवंत झरा' ! अशा जाहिराती निधी प्रकाशित झाला.

रात्रंदिवस शेतात राबणारा शेतकरी त्याच्या घरातील दारिद्रय, त्याच्या बरोबरीने कष्ट उपसणारी त्याची घरधनीण, त्याच्या कुटुंबातील इतर माणसे, त्यांची स्वप्ने, इच्छा, आकांक्षा, भोवतीचे समग्र ग्रामविश्व हा 'हिरवे जग' मधील कवितेचा विषय आहे. त्यात शेतक-याची भाषा आणि यातील कवितेची भाषा वेगळी नाही. जणू त्या जीवनातूनच ही कविता आपसूक फुलून आली आहे. येथे यादवांना जे जीवन शब्दरूप करावयाचे आहे ते अविरत कष्टांनी आणि दु:खानी भरलेले आहे. यातील कवितांना महाराष्ट्राच्या मातीचा गंध लाभला आहे.

## मळयाची माती (१९७८)

'हिरव जग' या कविता संग्रहाला राज्य सरकारचे पारितोषिक मिळाल्यावर त्यांना लिहिण्याची प्रेरणा मिळाली. 'मळयाची माती' हा त्यांचा दुसरा कविता संग्रह १९७८ मध्ये प्रसिध्द झाला. यात नोकरीनिमित्त शहरात जाऊन कवी खेडयापासून दूरावतो. शहरी जीवनाच्या धकाधकीत जगणे भाग असलेल्या कवीला मनातून मातीची खोलवर ओढ आहे. शहरी जीवनातले परकेपण आणि ग्रामीण जीवनापासूनचे तुटलेपण या व्दंव्दात तो घायाळ होतो. एक प्रकारचे दुभंगलेपण अनुभवू लागतो. 'मळयाची माती' मधील अनेक कवितांतून ही जाणीव व्यक्त झाली आहे.

## मायलेकर

या काव्यात यादवांनी खंडकाव्यसदृश रचनेला हात घातला आहे. खरे म्हणजे या रचनेला दीर्घभावकाव्य म्हणणे उचित ठरेल. 'मायलेकर' या कवितासंग्रहात खेडयातील

आई आणि शिकून व्दिपदवीधर होऊन परत आलेला मुलगा यांच्यातील एक दीर्घ संवाद आहे. पूर्वार्ध व उत्तरार्ध असे संवादाचे दोन भाग आहेत. पूर्वार्धात 'माय' चे मनोगत तर उत्तरार्धात 'लेकरा' ची कैफियत आहे. मायच्या मनोगतात खेडयातील आईचे आपल्या मुलाच्या सुखी संसाराचे पारंपारिक स्वप्न रंगविले आहे. तर लेकराच्या उद्‌गारान त्याच्या उदात्त स्वप्नांचे, उच्च आकाक्षांचे दर्शन घडविले आहे.

'हिरवे जग', 'मळयाची माती', 'मामलेकर' हया तीन काव्यकृती म्हणजे यादवांच्या काव्यलेखनातील तीन टप्पे आहेत. या तिन्ही कवितासंग्रहामध्ये त्याचा विकास होत गेलेला दिसून येतो.

## कथा लेखन

'खळाळ' हा कथासंग्रह १९६७ मध्ये प्रसिध्द झाला. यातील कथा प्रामुख्याने 'सत्यकथे' सारख्या वाङ:मयीन क्षेत्रात प्रतिष्ठा पावलेल्या होत्या. या कथासंग्रहात वंशाच्या दिव्याची उत्कट आस बाळगून जगण्यासाठी धडपडणा-या काबाडकष्ट श्रमिकांचे शेतमजूराचे काम करणा-या ग्रामीण माणसांच्या जीवनातील दु:खाचा समर्थपणे वेध घेतला आहे. या व्यक्तिंची दु:खे प्रामुख्याने आर्थिकदृष्टया खालच्या सामाजिक स्तरातील व्यक्तिंची दु:खे आहेत. धुणं, उनाच, सातव, मोर, इंजेन, माघारी इत्यादी काही कथांतील व्यक्तिंची दु:खे दारिद्रयाशिवाय अन्य अनेक कारणांनी ती उद्‌भवली आहेत.

'मातीखालची माती' यामध्ये खेडयापाडयातील अनेक व्यक्तिचित्रे आली आहेत. सत्यहिन प्रतीचे, हिन दिन प्रतीच्या चित्रण आले आहे.

मातीतले मोती हा १९७० साली ग्रामीण कथांचा यामध्ये संग्रह केला आहे. अनेक मान्यवर लेखकांच्या कथांचा संग्रह यामध्ये केला आहे.

'घरजावई' हा १९७४ मध्ये प्रसिध्द झालेला विनोदी कथासंग्रह आहे. यातील विनोद केवळ शब्दिक नाही. तर तो प्राधान्याने प्रसंगनिष्ठ आहे. याप्रमाणेच 'माळावरची मैना' यातही प्रमुख्याने विनोदी कथा आहेत. सतत मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणारे साहित्य वाचून कंटाळलेल्या वाचक वर्गाला या दोन्ही कथासंग्रहातील कथा रूचिपालटाचा आनंद देते.

'आदिताल' १९८० साली हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. मानवी मनातील आदिम कामभावनेचा वेध घेण्याचा प्रयत्न या कथातून यादवांनी केला आहे. या संग्रहातील कथांमध्ये प्रतीकात्मतेचा वापर मोठया प्रमाणात केलेला आहे. स्त्री माती ही सर्जनाची प्रतीके म्हणून या कथात अवतरताना दिसतात. निसर्गाला सतत पुन:र्निर्मिती हवी असते. म्हणून तो आपले साध्य स्त्री-पुरूष संबंधाकडून किंवा माणसाला निसर्गावर प्रेम करायला

लावून हरप्रकारे करवून घेत असते म्हणून मातीच्या स्त्रीच्या सर्जनशीलतेची कथात्म चित्रणे हे या संग्रहाचे वैशिष्टय आहे. या संग्रहसतील 'स्त्री' ही जशी प्रकृती सर्जनाचे प्रतीक आहे. तशीच ती कलावंताला जन्माला घालणारी माता ही आहे.

'डवरणी' हा कथासंग्रह १९८२ मध्ये प्रसिध्द झाला यामध्ये ग्रामीण जीवनातील भीषण दारिद्रयाचे चित्रण तसेच मुलभूत मानवी भावनांचा शोध घेतात. शहरातील स्त्री कर्मचारी खेडयात आल्यावर त्यांच्याकडे पाहण्याचा गावातील टग्यांचा दृष्टीकोन कसा असतो. गुन्हेगार मानल्या गेलेल्या रामोशी जातीच्या जीवनाचे चित्रणही याच कथासंग्रहात आहे आहे. दारिद्रय व्यसनाधीनता आणि बदफैलीपण यात पिचलेले ग्रामजीवन हा 'डवरणी' मधील काही कथांचा विषय आहे.

'उखडलेली झाडे' या १९८६ मध्ये प्रसिध्द झालेल्या कथासंग्रहात प्रामुख्याने शहर आणि खेडे शोषक आणि शोषित, प्रस्थापित आणि विस्थापित, पांढरपेशी बुध्दिजीवी मध्यमवर्ग आणि दरिद्री कष्टकरी कनिष्टवर्ग यांच्या परस्परसंबंधाचे प्रत्ययकारी चित्रण आहे. प्रवाही निवेदनशैली, प्रतिमायुक्त कथाशीर्षके, निवेदन-संवादाला लाभलेला बोलीचा मुलायम स्पर्श, जीवनदर्शनाला सखोलता देणारे समर्पक भाष्य कधीकधी पोरतिडकीमुळे त्या भाष्याला आलेला उपरोधाचा तीव्र सूर इत्यादी वेशिष्टयांमुळे या कथासंग्रहाची प्रकृती धारदार बनली आहे.

## कादंबरी

आनंद यादव यांच्या तीस-पस्तीस वर्षाच्या वाङ:मयीन वाटचालीत कविता, कथा संग्रहाबरोबरचे त्यांनी कादंबरी लेखन केले त्यांनी एकूण सात कादंब-या लिहिल्या अलिकडे प्रसिध्द झालेली 'काचवेल' या कादंबरीमध्ये गुणवत्तेच्या व वैशिष्टयपूर्णतेच्या दृष्टीने वेगळी वाट चोखळली आहे.

'एकलकोंडा' त्यांची पहिली कादंबरी ही पुस्तकरूपाने जरी १९८० साली प्रसिध्द झाली असली तरी तिचे लेखन १९५९ साली झाले आहे. यात शिक्षणासाठी धडपडणा-या आणि शिक्षण घेऊनही बेकारीच्या खाईत पडलेल्या एका ग्रामीण तरूणाची ससेहोलपट चित्रित करणारी कादंबरी आहे. शिक्षण घेऊनही आपला प्रश्न सुटत नाही, परिस्थितीमुळे शहरातल्या घाईगर्दीत सापडलेला हा तरूण स्वत:ची ओळख हरवल्यासारखा भटकत राहतो, एकलकोंडा बनतो. शेवटी आपल्या खेडयाशिवाय आपल्या जीवनाला किनारा लाभणार नाही ही जाणीव होऊन तो पुन्हा आपल्या माणसांत परत येतो. हा प्रवास लेखकाने प्रत्ययकारकपणे चित्रित केला आहे.

'गोतावळा' ही दुसरी कादंबरी मे १९७१ मध्ये प्रसिध्द झाली असली तरी १९६८ ते ७० या काळात त्यांनी तिचे लेखन केले. कोल्हापूर - कागल परिसरातल्या एका खेडेगावात सालगडी म्हणून शेतकाम करणा-या नारबाची ही आत्मकथा आहे. आईबापाविना वाढलेला राम सोनावडेच्या शेतात कामाला राहतो. ढोरागुरांबरोबर तो आपल माणूसपण विसरू शकत नाही. मालक ट्रॅक्टर घेण्याचा विचाराने मालक सर्व जनावरे विकतो. एक एक करत सर्व जनावर विकतो. काही म्हातारी होऊन मरतात. त्यामुळे नारबा एकटा राहतो. त्याचा गोतावळा नष्ट होत जातो. तसतसा नारबाही उद्ध्वस्त होत जातो.

'नटरंग' ही १९८० साली प्रसिध्द झाली यात कलाविश्वात हरवून जाण्याचा ध्यास गुणबाला आहे. तमाशाच्या ध्यासापायी जीवन उद्ध्वस्त झालेल्या गुणा या तमाशा कलावंताच्या जीवनाची शोकांतिका या कादंबरीत शब्दांकित केली आहे.

'माऊली' ही कादंबरी १९८५ मध्ये प्रसिध्द झाली. या कादंबरीत मांजराच्या जीवनाचे एक वेगळे अनुभवविश्व साकार करते. मांजरीचे तिच्या पिलांचे आणि पर्यायाने मांजराच्या जीवनाचे, त्यांच्या जगण्याच्या संघर्षाचे तपशिलवार चित्रण करून मांजरविश्वाचे अभिनव दर्शन घडविले आहे.

'झोंबी' ही त्यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी १९८७ साली प्रसिध्द झाली. तिला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. यात बालपणापासून मॅट्रीक पर्यंतचा जीवनप्रवास वर्णिला आहे.

'नांगरणी' ही दुसरी आत्मचरित्रात्मक कादंबरी १९९० मध्ये प्रसिध्द झाली. यात एम्. ए. पर्यंतच्या शिक्षणासाठी केलेल्या पराकाष्ठेच्या प्रयत्नांचे दर्शन घडविले आहे.

'घरभिंती' ही तिसरी आत्मचरित्रात्मक कादंबरी १९९२ मध्ये प्रसिध्द झाली. पंढरपूर येथे महाविद्यालयात प्राध्यापक झाल्यापासून वडिलांच्या मृत्यूपर्यंतचा काळ यात आला आहे.

अलिकडेच प्रसिध्द झालेला चौथा भाग 'काचवेल' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी १९९७ मध्ये प्रसिध्द झाली. यात १९७८ ते १९९५ अखेरपर्यंतचा काळ आलेला आहे.

## समीक्षा

ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या १९७९, ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव १९८१, मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती १९८५, साहित्याची निर्मिती प्रक्रिया १९८९, अलिकडे प्रसिध्द झालेले 'आत्मचरित्रमीमांसा' १९९८ इत्यादी समिक्षणात्मक ग्रंथ लिहिले.

## ललितलेख :

'स्पर्शकमल' १९७८ पहिला लेखसंग्रह असून त्यात पंधरा ललितलेखांचा समावेश आहे. आस्वादाच्या पातळीवर स्त्रीच्या विविध रूपातील सौंदर्य अविष्कृत करावे या प्रेरणेने हे लिंहिलेले आहेत.

'पाणभवरे' हा १९८२ मधील दुसरा ललितलेखसंग्रह यात गावाकडील जुन्या आठवणीचा वेध घेतला आहे.

आनंद यादवांनी आपल्या सहित्या प्रवासात वेगवेगळे वाङ:मयप्रकार समर्थपणे हाताळले आणि त्या त्या वाङ:मयप्रकारात आपले वैशिष्टपूर्णस्थान निर्माण केले. त्यांच्या ललित साहित्याचा विचार करता कविता, कथा, कादंबरी, ललितगद्य, आणि आत्मचरित्रात्मक कादंबरी या क्रमाने त्यांची वाङ:मयीन वाटचाल झालेली आहे. त्यांनी वेगवेगळे वाङ:मयप्रकार हाताळले आहेत. ग्रामीण जीवन हाच त्यांच्या साहित्याचा प्रधान विषय राहिला. ललितलेखन करीत असताना त्यांनी साहित्याविष्यक प्रश्नांचे जे चिंतन केले त्यातून त्यांचे समीक्षालेखन जन्मले. एकाच वेळी सृजनशील सहित्यिक आणि चिकित्सक वाङ:मयविमर्शक या दोन्ही बाजू त्यांच्या व्यक्तित्वात एकवटल्या आहेत. थोडक्यात मूलभूत सामाजिक जाणिवा व्यक्त करणारे ललितलेखन आणि मराठी साहित्य विचारात महत्वाची भर घालणारे समीक्षालेखन या गुणवैशिष्टयांमुळे आधुनिक काळातील एक महत्वाचा लेखक म्हणून यादव यांच्याकडे पाहिले जाते.

झोंबी, नांगरणी, घरभिंती या तीन आत्मचरित्रात्मक कादंब-यांचा या लघुप्रबंधिकेत चिकित्सक आभ्यास करावयाचा योजिले आहे. हा आभ्यास सामाजिक आणि वाङ:मय या उभयविध दृष्टिकोनातून होणार आहे. कारण स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील दोन दशके स्वातंत्र्योत्तर कालखंडातील चार दशके महाराष्ट्रातील कष्टकरी श्रमकांचे प्रतिनिधीत्व करणा-या आनंद यादवांच्या या आत्मचरित्रात्मक कादंब-या एक सामाजिक दस्तऐवजच आहे.

# संदर्भ सूची

| पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| आनंद यादव साहित्य आणि जीवन | डॉ एस. एम. कानडजे | मलपृष्ठ |
| नांगरणी | आनंद यादव | २४३-४४ |
| आनंद यादव व्यक्ती आणि वाड:मय | डॉ रवींद्र ठाकूर | |
| झोंबी (प्रस्तावना) | आनंद यादव | |